**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अशोक रामचंद्र कोळी
घर नं.८०९, वाळवे गल्ली, मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५० / २००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अशोक रामचंद्र कोळी
घर नं.८०९, वाळवे गल्ली, मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. प्रदीप काटकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. जे. एन. कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.८.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.९.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयातील असूनही दिली नाही. देऊ केलेली माहिती आपल्या मागणीनुसार नसल्यामुळे नाकारली. तहसील कार्यालयाने आपल्याला दिलेली कारणे दाखवा नोटीस मिळाली, त्याच तारखेला आपल्याला निलंबित केले असल्यामुळे या नोटिशीची आपली पोहच महत्त्वाची आहे. त्याची छायांकित प्रत दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अशोक रामचंद्र कोळी यांनी केली.

कळविलेले शुल्क श्री. कोळी यांनी भरले नाही व मागणी केलेली सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्याचे दाखवूनही माहिती नाकारली. त्यांना हव्या असलेल्या नोटिशीची पोहच दाखल नसल्यामुळे देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर श्री. जे. एन. कांबळे यांनी केले.

श्री. कोळी यांनी अनेक मुद्दयांमध्ये खुलासा, स्पष्टीकरण, पुरावे यांची मागणी केली आहे. या बाबी माहितीचाअधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसेच ३ वर्षांमधील माहिती विशिष्ट तक्त्यात संकलित करून देण्याची मागणी त्यांनी केली असून त्यानुसार माहिती देणे शक्य नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर श्री. प्रदीप काटकर यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याने बहुसंख्य मुद्दयांमध्ये केलेली (उदा. मुद्दा क्रं. ५,७,८ व ११ ) विचारणा माहितीचाअधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि संबंधित संचिकेचे अवलोकन अपीलकर्त्यास करू द्यावे व त्यातील आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्याने लेखी मागणी केल्यास योग्य ते शुल्क आकारुन द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अनेक अटी सांगितल्या, अशी तक्रार श्री. कोळी यांनी दि. १५.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. आपण मागणी केलेली माहिती किंवा मुद्देनिहाय खुलासा पुरविण्याचे आदेश संबंधितांना देण्याची मागणी त्यांनी केली. ही मागणी अमान्य करण्यात येत

आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मूळ अर्जानुसार देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने शुल्क भरुन घेणे आवश्यक होते. त्या व्यतिरिक्तची माहिती हवी असल्यास संचिकेचे अवलोकन करून सशुल्क प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 21 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वनाथ विरपाक्षप्पा लोणी
२३१, जोडभावी पेठ, गोलचावडी पाठीमागे,
व्यापारी बँकेजवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५३ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विश्वनाथ विरपाक्षप्पा लोणी
२३१, जोडभावी पेठ, गोलचावडी पाठीमागे, व्यापारी बँकेजवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर प्रतिनिधी श्री.संभाजी चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.संभाजी चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.४.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.५.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.६.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.९.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

रास्त भाव धान्य दुकानाच्या मालकाच्या खोट्या सह्या करून परवान्याचे नूतनीकरण केल्याबाबत गुप्तचर खात्यामार्फत चौकशी करून कार्यवाही करण्याच्या आपल्या मागणीनुसार माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विश्वनाथ विरपाक्षप्पा लोणी यांनी केली.

प्रशासकीय कार्यवाही करून माहिती द्यावी, अशा स्वरूपाची अपीलकर्त्याची मागणी असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तरीही परवान्याच्या नूतनीकरणाची माहिती त्यांना दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर श्री.संभाजी चव्हाण यांनी केले. जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
21 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रमेश मधुकर पवार
मु. लमाणतांडा, पो. कामती खुर्द, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री परमेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, कामती खुर्द,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५४ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमेश मधुकर पवार
मु. लमाणतांडा, पो. कामती खुर्द, ता. मोहोळ, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, सोलापूर तर्फे प्रतिनिधी श्री. एस. एस. कलशेट्टी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री परमेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, कामती खुर्द, ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१०.२००९ |

| | |
|---|---|
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

विशिष्ट तक्त्यात संकलित करून तपशीलवार माहिती मिळण्याची मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री परमेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, कामती खुर्द, ता. मोहोळ यांच्याकडे केली होती. त्यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी अपिलाची दखल घेतली नाही म्हणून संबंधितांवर दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रमेश मधुकर पवार यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री परमेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, कामती खुर्द, ता. मोहोळ यांनी साध्या टपालाने माहिती पाठविली. माहिती समक्ष देण्याचा प्रयत्न केला असता घर बंद असल्याचे आढळले. अपीलकर्ता श्री. पवार जुलै १९९८ ते फेब्रुवारी २००७ पर्यंत शाळेत लिपिक पदावर कार्यरत होते. त्यांनी व तत्कालीन मुख्याध्यापकांनी केलेल्या बेकायदेशीर कामामुळे शासनाने शाळेची मान्यता काढून घेतली असून प्रशासकाची नियुक्ती केली आहे. त्रास देण्यासाठी श्री. पवार सातत्याने अशा स्वरूपाचे अर्ज व तक्रारी करीत असून त्यांच्या विरूध्द जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे जानेवारी २०१० मध्येच तक्रार केली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री परमेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, कामती खुर्द, ता. मोहोळ श्री. च. शि. म्हेत्री यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री. पवार यांनी दि. १९.९.२००९ रोजी केलेल्या अपिलाची दि. १२.१२.२००९ रोजी आपण सुनावणी घेतली व माहिती तत्काळ देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री परमेश्वर माध्यमिक आश्रमशाळा, कामती खुर्द, ता. मोहोळ यांना दिले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर श्री. एस. एस. कलशेट्टी यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित मुदतीनुसार अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ३० दिवसांत व अपवादात्मक स्थितीत ४५ दिवसांत प्रथम अपिलाचा निर्णय देणे बंधनकारक आहे, त्यानुसार कार्यवाही केली पाहिजे, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर श्रीमती मनिषा फुले यांना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्याची मागणी व संबंधित प्रकरणातील कागदपत्रे यांचा विचार करता अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर देण्यात आले आहे, तसेच अर्जातील मुद्दा क्र. १ नुसार पावत्यांच्या सत्य प्रती आयोगाच्या मौखिक आदेशानुसार देण्यात आल्या आहेत. विशिष्ट तक्त्यातच माहिती संकलित करून देण्याची अपीलकर्त्याची मागणी मान्य करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकेचे अवलोकन शाळेवरील प्रशासक श्री. सुधाकर विश्वनाथ दिवसे यांनी अपीलकर्त्यास करु द्यावे व त्यांनी लेखी मागणी नोंदविल्यास त्यानुसार कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन पुरवाव्या.

**पुणे**
**दि. 21 MAY 2010**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश ज्ञानदेव माने
शिरढोण, ता.कोरेगाव, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव,
ता.कोरेगाव, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव,
ता.कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५७ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महेश ज्ञानदेव माने
शिरढोण, ता.कोरेगाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्रीमती किर्ती नलावडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव,
ता.कोरेगाव, जि.सातारा श्रीमती स्मिता पवार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.७.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

न्यायालयीन कामासाठी आपण मागणी केलेले सन १९७५ पर्यंतचे ७/१२ उतारे मिळाले नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.महेश ज्ञानदेव माने यांनी केली.

संदर्भीत जमिनीचे सन १९७५ ते १९७९-१९८० या काळातील उतारे उपलब्ध नाहीत. तसे अपीलकर्त्यास कळविले. त्याबाबतच्या खुलाशाची मागणी त्यांनी अर्जात केली आहे. संबंधित अभिलेखाचा शोध घेऊन माहिती देण्याचा प्रयत्न आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्रीमती स्मिता पवार यांनी केले.

आठ-अ नोंदीमध्ये गट क्रमांकाची नोंद असते, त्या आधारे माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्रीमती किर्ती नलावडे यांनी केले.

आठ-अ पत्रकावरून अपीलकर्त्यास आठ दिवसांत माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नाही. ७/१२ चे उतारे मिळत नसल्यास तसे पत्र जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा यांनी आपल्याला द्यावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.महेश ज्ञानदेव माने यांनी दि.२१.४.२०१० च्या पत्रान्वये तहसीलदार, कोरेगाव यांच्याकडे केली. परंतु कोणतीही कार्यवाही त्यांनी केली नाही, असे निवेदन श्री.माने यांनी दि.२१.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर

केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आठ-अ पत्रकावरून अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्रीमती स्मिता पवार व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्रीमती किर्ती नलावडे यांनी दि.५.६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**

20 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज अँड कन्सल्टसीज,
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई-पुणे रोड,
कासारवाडी, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद सातारा,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कृषी विकास अधिकारी,**
जिल्हा परिषद सातारा,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६६/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/०३/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वैद्यकीय अधीक्षक ससून हॉस्पिटल यांनी दि. १३/०१/२००६ रोजी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचा आवक क्रमांक व त्यासंदर्भातील कार्यालयीन टिप्पणी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शेरे इ. छायाप्रती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांना दि. ५/०३/२००८ च्या पत्रान्वये माहितीसाठीच्या शुल्काचा भरणा करण्यास कळविण्यात आले होते. तथापि अपीलकर्त्यांनी पैसे भरले नाहीत. अपीलकर्त्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी

सदरचे पत्र मिळाले नसल्याचे सांगितल्याने अपीलकर्त्यास मोफत माहिती देण्यात यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला, त्यानुसार दि.३/०४/२००८ रोजी पोस्टाचा दाखला घेऊन अपीलकर्त्यास माहिती पाठविण्यात आली', असे जन माहिती अधिकारी तथा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सातारा, श्री.सी.जी.बागल यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांनी योग्य कार्यवाही केली असून आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 28 MAY 2010

(माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.)

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग बाबुराव बेनके
फ्लॅट नं.१०,अक्षय क्लासिक आझादनगर,
एस.आर.पी.एफ., पुणे-२२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७१/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०७.०४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.पांडुरंग बाबुराव बेनके
फ्लॅट नं.१०,अक्षय क्लासिक आझादनगर,
एस.आर.पी.एफ., पुणे-२२

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पूर्व विभाग), पुणे-१ श्री.अ.भि.चव्हाण

**जन माहिती अधिकारी तथा** उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे-१ श्री.सु.आ.चौधरी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०१.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.१०.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपिलाच्या सुनावणीला उपस्थित न राहता उपस्थिती पत्रकावर सही करुन अपीलकर्ता श्री.पांडुरंग बाबुराव बेनके निघून गेले.

अपीलकर्ता श्री.पांडुरंग बाबुराव बेनके विविध स्वरुपाची विस्तृत माहिती मागणारे अर्ज व अपिले सातत्याने करतात. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे यांना वेळी अवेळी भ्रमणध्वनीवरुन अनेक वेळा फोन करतात व असभ्य भाषेत बोलतात. पत्रव्यवहारातही असंसदीय, अशोभनीय भाषा वापरतात. माहितीच्या अधिकाराच्या कायद्याच्या चौकटीत राहूनच माहितीबाबतचे अर्ज करण्यास त्यांना कळविले. एकाच दिवशी ९ अर्ज व ३५ अपिले त्यांनी केल्याची उदाहरणे आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे श्री.सु.आ.चौधरी व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व विभाग), पुणे श्री.अ.भि.चव्हाण यांनी केले. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारीही आपण दर्शविली असल्याचे त्यांनी नमूद केले. आपल्या प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केले.

कार्यकारी अभियंता श्री.अतुल चव्हाण यांनी आपल्याला अश्लील शिवीगाळ केली. मारण्यासाठी धमकावले. एवढेच नाही, तर मारण्यासाठी बाहेरुन गुंड आणून बाहेर थांबविले होते. त्याबाबत आपण बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार गुदरली आहे. असे अपीलकर्ता श्री.बेनके यांनी त्यांच्या लेखी निवेदनात म्हटले आहे. 'चुकीचे निर्णय देऊन फक्त श्री.अतुल चव्हाण पळवाट शोधत असतोय व मागविलेली माहिती कधीही देत नाही', असेही श्री.बेनके यांनी अपील अर्जात लिहिले आहे.

श्री.बेनके यांनी पोलिसांकडे गुदरलेल्या तक्रारींची शहानिशा पोलिसांमार्फत होईल. मात्र अधिकृत कागदपत्रांत त्यांनी वापरलेली भाषा असंसदीय आहे. अशी भाषा न वापरण्याची समज त्यांना देण्यात येत आहे. त्यांच्या मूळ अर्जातील परिछेद क्र.४ हा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. त्यांनी मागितलेली

माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची असून आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करुन योग्य ते शुल्क भरुन कागदपत्रांच्या प्रती त्यांना प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनीष एच.मिलानी
द्वारा श्री गजानन डेव्हलपर्स, ९, शांग्रिला गार्डन, बंडगार्डन रोड,
आयसीआयसीआय बँकेशेजारी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन,
भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनीष एच.मिलानी प्रतिनिधी श्रीमती मनीषा गुजराथी
द्वारा श्री गजानन डेव्हलपर्स, ९, शांग्रिला गार्डन, बंडगार्डन रोड,
आयसीआयसीआय बँकेशेजारी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन,
भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधाकर तेलंग

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.१०.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.९.१२.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

रस्ता रुंदीसाठी भूसंपादन झाले आहे काय, याबाबतची योग्य माहिती दिली जात नाही. संरक्षण खात्याच्या जागेवर काम केले जात असल्याचे सांगितले जाते. भूसंपादन झाले नसल्यास तसे लेखी द्यावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.मनीष एच.मिलानी यांच्या प्रतिनिधी श्रीमती.मनिषा गुजराथी यांनी केली. आपल्याला विलंबाने माहिती दिल्याचे त्यांनी नमूद केले.

मागितलेली माहिती संरक्षण विभागाशी संबंधित होती. याबातच्या संचिकेचे काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वाईन फ्ल्यूसाठी अत्यावश्यक सेवेची नेमणूक असल्यामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही. दहा दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, भूसंपादन व व्यवस्थापन, भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यांना सर्व संचिका दाखविण्यात आल्या व त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या. संरक्षण खात्याल सरकारकडून जमीन दिली आहे, हे अपीलकर्त्यांना स्पष्ट केले आहे. संबंधित प्रकरण सध्या उच्च न्यायालयात दाखल असल्यामुळे कागदपत्रांमधील माहितीविषयी भाष्य करता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी तथा

सहाय्यक अभियंता, भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, भूसपांदन व व्यवस्थापन, भूमी जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुधाकर तेलंग यांनी नमूद केले. त्यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रंमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**28 MAY 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हर्षकुमार पो.बम्ब
३६,कोहिनूर प्लॅनेट,
सर्व्हे नं.१३/६, औंध,पुणे-७ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
मुळशी तहसील कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
मुळशी तहसील कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०६.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री.हर्षकुमार पो.बम्ब<br>३६,कोहिनूर प्लॅनेट,<br>सर्व्हे नं.१३/६, औंध,पुणे-७<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,<br>मुळशी तहसील कार्यालय,ता.मुळशी, जि.पुणे श्री.भाऊसाहेब बाबुराव जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,<br>मुळशी तहसील कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर वसंतराव घाडगे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०६.१२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एप्रिल १९९९ पासून आलेली अ पत्रके व त्यावरील कार्यवाही या संदर्भातील संख्या आपण माहिती म्हणून मागितली होती. परंतु संबंधित नोंदवहीतील पृष्ठांच्या छायांकित प्रती घेण्यासाठी आपल्याला रु.१९५०/- एवढे शुल्क जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी तहसील कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर वसंतराव घाडगे यांनी कळविले. एका पृष्ठाएवढ्या संकलित माहितीसाठी अनेक छायांकित प्रती आपल्याला नको आहेत. त्यामुळे आपण शुल्क भरले नाही. संकलित स्वरुपात माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.हर्षकुमार पो.बम्ब यांनी केली.

दुय्यम निबंधकाकडून आपल्या कार्यालयाला अ पत्रक प्राप्त झाल्यानंतर नोंदवहीत नोंद करुन पुढील कार्यवाहीसाठी संबंधित तलाठ्याकडे पाठविले जाते. सन २००१ ते दि.३१.०३.२००९ अखेरची नोंदवही उपलब्ध आहे. त्यावरुन संकलित करुन माहिती देणे शक्य नसल्यामुळे छायांकित प्रती घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी तहसील कार्यालय,ता.मुळशी, जि.पुणे श्री.किशोर वसंतराव घाडगे यांनी केले. मागणीनुसार केवळ संख्या अपेक्षित असल्यास नोंदवहीवरुन बेरीज करुन देता येईल. मात्र किती प्रकरणी कार्यवाही केली नाही अशा स्वरुपाचा विस्तृत तपशील देता येणार नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,मुळशी तहसील कार्यालय,ता.मुळशी,जि.पुणे श्री.भाऊसाहेब बाबुराव जाधव यांनी नमूद केले.

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मुळशी तहसील कार्यालय, ता.मुळशी,जि.पुणे श्री.भाऊसाहेब बाबुराव जाधव यांनी नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अ पत्रकांनुसार केलेल्या नोंदींची संख्या कळवावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती वैशाली विक्रमसिंह जहागीरदार
१०५, रेल्वे लाईन्स, नॅशनल लॉण्ड्रीमागे,
स्टेशन रोड, सोलापूर - २३१ २८६ — अपीलकर्त्या

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९४ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२०१० |
| ३ | उपस्थित<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर<br>तर्फे प्रतिनिधी श्री. प्रशांत लक्ष्मण शहापूरकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.७.२००९ , २०.८.२००९ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती वैशाली विक्रमसिंह जहागीरदार यांनी सहकारी गृहनिर्माण संस्थेसंदर्भातील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी संबंधित माहिती देण्याबाबत संस्थेला कळविले. परंतु तरीही माहिती मिळाली नाही, म्हणून

श्रीमती वैशाली विक्रमसिंह जहागीरदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. प्रथम अपील अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्याकडे केलेले नाही. तसेच त्यांनी त्यांच्या स्वतःच्या सभासत्वाच्या अनुषंगाने व संस्थेच्या कामकाजाबाबत अनेक तक्रारी केल्या आहेत. संस्थेविरूध्द त्यांनी केलेल्या तक्रारींची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांना दिले होते. वस्तुतः संबंधित माहिती संस्था स्तरावरील असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५६६६/ २००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री. प्रशांत लक्ष्मण शहापूरकर यांनी केले. ते रास्त आहे. संबंधित माहिती संस्थेकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यांना समक्ष सादर करण्यात आली, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी दि. ९.४.२०१० च्या पत्रान्वये श्रीमती जहागीरदार यांची पोहच असलेल्या प्रतीसह आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 21 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय ज्ञानू मंडले
मंडले वस्ती, महूद, ता.सांगोला, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सांगोला,
ता.सांगोला, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला,
ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१९ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय ज्ञानू मंडले
मंडले वस्ती, महूद, ता.सांगोला, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला,
जि.सोलापूर श्री.एस.एस.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला,
ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.आर.टी.वाळुंजकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.९.९.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेल्या महितीबाबत विहित मुदतीत कळविले नाही. आपण दारिद्र्यरेषेखाली असतानाही शुल्क कळविले. नि:शुल्क माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दत्तात्रय ज्ञानू मंडले यांनी केली.

श्री.मंडले यांच्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.एस.एस.भोसले यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. दिलेल्या आदेशाच्या नकला श्री.मंडले यांनी मागितल्या होत्या. एका प्रतीचे रूपये ३ प्रमाणे त्याचे शुल्क तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती शिल्पा ठोकळे यांनी कळविले. नंतर माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.आर.टी.वाळुंजकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्री.एस.एस.भोसले यांनी केले.

दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला नि:शुल्क माहिती देण्याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ७(५) मध्ये तरतूद अहे. तरीही अपीलकर्त्यास शुल्क कळविणे व जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर म्हणून स्वत:च उत्तर देणे याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती शिल्पा ठोकळे यांनी आयोगाला सादर करावा, अपिलीय

प्राधिकारी तथा तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी त्यांना याविषयी अवगत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी आयोगाला सादर करावा.

पुणे

28 MAY 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक रघुनाथ राऊत
ठाकूर पुजा, ७७, तपोधाम कॉलनी,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे .. **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे .. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>२००३ / पुणे</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>१०.३.२०१०</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="2">**उपस्थिती**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. दिपक रघुनाथ राऊत<br>ठाकूर पुजा, ७७, तपोधाम कॉलनी,<br>तळेगाव दाभाडे, जि. पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.,<br>तळेगाव दाभाडे, जि. पुणे श्री. जितेंद्र भालचंद्र गायकवाड</td></tr>
<tr><td>३</td><td>जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख</td><td>१६.१.२००८</td></tr>
<tr><td>४</td><td>जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराची तारीख</td><td>१०.३.२००८</td></tr>
<tr><td>५</td><td>प्रथम अपिलाची तारीख</td><td>२२.२.२००८</td></tr>
<tr><td>६</td><td colspan="2">माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

वीज बिलावरील पिनकोड बदलण्यासाठी आपण केलेल्या अर्जाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., तळेगाव दाभाडे, जि. पुणे यांनी विहित मुदतीत दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., तळेगाव दाभाडे, जि. पुणे यांनी यांनी अपिलाची दखल घेतली नाही. प्रथम अपिलानंतर शुल्क कळविण्यात आले. विहित मुदतीत माहिती न देणा-या अधिका-यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दिपक रघुनाथ राऊत यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम अढळ यांनी विहित मुदतीत माहिती दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसते, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., तळेगाव दाभाडे, श्री. जितेंद्र भालचंद्र गायकवाड यांनी केले.

माहिती-मागणीच्या अर्जासंबंधी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तंत्कालीन जंन माहिती अधिका-यांनी दोन दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. विठ्ठल तुकाराम अढळ यांनी दि. ११.३.२०१० च्या पत्रान्वये सविस्तर अहवाल सादर केला. वीज बिलावरील पिनकोड क्रमांक दुरुस्त करण्यासंबंधी श्री. राऊत यांनी दि. १६.११.२००७ रोजी अर्ज केला. त्यावरील कार्यवाहीची माहिती मागणारा माहिती अधिकारातील अर्ज दि. १६.२.२००८ रोजी केला. दि. ८.३.२००८ रोजीच्या त्यांच्या बिलावर दुरुस्त क्रमांक छापला आहे. विजेची बिले ग्रामीण भागात दर दोन महिन्यांनी छापण्यात येत असल्यामुळे मर्यादित कालावधीतच त्यांच्या पिनकोड क्रमांकात स्पष्ट दुरुस्ती झाल्याचे स्पष्ट होते. दरम्यान माहिती मागणीच्या त्यांच्या दि.१६.२.२००८ च्या अर्जावर दि. १०.३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे शुल्क कळविले. त्यांनी शुल्क भरले नाही, रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविण्यास टपालाने कळविले. परंतु मागणी करुनही टपाल हशील भरले नाही व राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. मूळ तक्रारीचे निवारण झालेले असताना व कळविलेले शुल्क न भरता अपीलकर्त्याने त्रास देण्यासाठी तक्रार केली आहे, असे श्री. अढळ यांनी या खुलाशात नमूद केले असून संबंधित सर्व पत्रव्यवहाराच्या व संदर्भित वीज बिलाच्या

प्रती सोबत जोडल्या आहेत. या बाबी लक्षात घेता अपीलकर्त्याने केलेली तक्रार निरर्थक असल्याचे स्पष्ट होते. सर्व यंत्रणांचा वेळ व अपव्यय करण्याची ही कृती योग्य नसल्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 2 6 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सी.एन.बनकर
विहारे, बी-४/१२, बिबवेवाडी, पुणे -३७ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन (समन्वय) शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अव्वल कारकून,
भूसंपादन (समन्वय) शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री.सी.एन.बनकर<br>विहारे, बी-४/१२, बिबवेवाडी, पुणे -३७<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** अव्वल कारकून,<br>भूसंपादन (समन्वय) शाखा,<br>जिल्हाधिकारी कार्यालय पुणे श्रीमती एन.जी.चाबुकस्वार | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.०८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.१०.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्रस्तावित विमानतळ प्रकरणी भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी,पुणे यांना आपण पाठविलेल्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, भूसंपादन (समन्वय) शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. सदर भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१३ यांच्यामार्फत केली जात असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,भूसंपादन (समन्वय) शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांनी अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही. तसेच भूसंपादन कायद्यानुसार आपली हरकत नोंदवून घेण्याची मागणी आपण माहिती-मागणीच्या अर्जात केली होती. त्याबाबत काहीही कळविले नाही. विशेष भूमीसंपादन अधिकारी क्र.१३ यांनी संबंधित माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून घ्यावी, असे आपल्याला कळविले. माहिती न देण्याऱ्या अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सी.एन.बनकर यांनी केली.

श्री.बनकर यांचा अर्ज संबंधित कार्यालयाकडे वर्ग केला होता. तसेच त्याच कार्यालयातील अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे त्यांनी अपील करणे आवश्यक होते. तसे न करता त्यांनी उपजिल्हाधिकारी भूसंपादन (समन्वय), पुणे यांच्याकडे अपील केले. त्याबाबतही श्री.बनकर यांना कळविले होते. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,भूसंपादन (समन्वय) शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती एन.जी.चाबुकस्वार यांनी केले.

माहिती ज्या कार्यालयाकडे आहे त्यांच्याकडे अर्ज वर्ग करण्याचा जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,भूसंपादन (समन्वय) शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचा निर्णय योग्य आहे. तथापि अपीलकर्त्यास तेथूनही माहिती मिळालेली नाही. त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून माहिती घेण्यास सांगितले आहे, हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,भूसंपादन (समन्वय) शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी मुद्दा क्र.१ ची माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास नि:शुल्क पुरवावी.

असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्याच्या अर्जातील मुद्दा क्र.२ माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,भूसंपादन (समन्वय) शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे श्रीमती एन.जी.चाबुकस्वार यांनी दि.१५.०६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनील गजानन कुलकर्णी
४४/३५, नवसह्याद्री सोसायटी, कर्वेनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे(१), स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनील गजानन कुलकर्णी प्रतिनिधी श्री.ए.व्ही.वाराणशीवार
४४/३५, नवसह्याद्री सोसायटी, कर्वेनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.अ.अ.शेख

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे(१), स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे श्री.व्ही.व्ही.कोकरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.९.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुनील गजानन कुलकर्णी यांनी 'माहिती' मागितली नसून अभिप्राय, भाष्य, अन्वयार्थ याची विचारणा केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशी विचारणा करता येत नाही. तसेच स्वतः अपीलकर्ता कधीही हजर न राहता अर्जापासून अपिलापर्यंत सर्वत्र श्री.अमित वाराणशीवार हेच प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहतात. आजही तेच उपस्थित आहेत. त्यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर देण्यात आले असून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी अपील फेटाळले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे(१) श्री.व्ही.व्ही.कोकरे यांनी केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.एकनाथ काशिनाथ तावरे
१६/ १०५, म्युनिसिपल कॉलनी, गोखलेनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक व
तांत्रिक शिक्षण, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.एकनाथ काशिनाथ तावरे
१६/ १०५, म्युनिसिपल कॉलनी, गोखलेनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक व
तांत्रिक शिक्षण, पुणे महानगरपालिका, पुणे प्रतिनिधी श्री.धनंजय परदेशी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, पुणे श्री.चंद्रकांत कमरसिंग डिंबर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

माध्यमिक शाळेला माध्यमिक शाळा संहिता लागू असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला असतानाही, महापालिका आयुक्तांनी अनाधिकाराने मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्याला सेवेतून कमी केले. माहिती चुकीची दिली, अशी तक्रार अपीलकर्ता ॲड.एकनाथ काशिनाथ तावरे यांनी केली.

ॲड.तावरे यांच्या अर्जातील कारणे अथवा खुलासा विचारणारे मुद्दे वगळता सर्व माहिती मुद्देनिहाय व योग्य दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, पुणे श्री.चंद्रकांत कमरसिंग डिंबर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.धनंजय परदेशी यांनी पूरक कागदत्रांसह केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.एकनाथ काशिनाथ तावरे
१६/१०५,म्युनिसीपल कॉलनी,
गोखलेनगर, पुणे-१६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय,पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०११/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षण उपसंचालक,<br>पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे-१ श्री.सुनिल मगर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक शिक्षण संचालक,<br>शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय,<br>पुणे-१ श्री.व.मा.गायकवाड | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.११.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेत आपण सहाय्यक शिक्षक होतो. माध्यमिक शाळा संहितेनुसार शाळांचा कारभार चालतो. असे असताना बीपीएमसी ॲक्ट १९४९ च्या आधारे नियमबाह्यरीत्या महानगरपालिकेने आपल्याला सेवेतून कमी केले. त्या अनुषंगाने आपण मागितलेल्या ११ पैकी ३ मुद्दयांची योग्य माहिती दिली. अन्य मुद्दयांची माहितीही दिली नाही व अर्ज योग्य ठिकाणी वर्गही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता ॲड.एकनाथ काशिनाथ तावरे यांनी केली.

ॲड.तावरे यांना ११ मुद्दयांवर उत्तर दिले. अनेक मुद्दयांमध्ये त्यांनी मत अभिप्राय, भाष्य, खुलासा याची मागणी केली आहे. ती आपल्या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय,पुणे-१ श्री.व.मा.गायकवाड यांनी केले. 'माहिती'च्या व्याखेत बसणारी माहिती ॲड.तावरे यांना दिली. ढोबळ मानाने भाष्य वा अभिप्राय मागण्यापेक्षा निश्चित स्वरुपात प्रश्न मांडल्यास आपण मार्गदर्शन करु, अशी तयारी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दर्शविली. परंतु त्यांनी काहीही सांगितले नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे-१ श्री.सुनिल मगर यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे श्री.व.मा.गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय, पुणे श्री.सुनिल मगर यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**स्थळ : पुणे**
**दि. 28 MAY 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विक्रम शंकर धुमाळ
मु.पो.औंध, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१६ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विक्रम शंकर धुमाळ
मु.पो.औंध, ता.खटाव, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एल.कुंभारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.९.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या आईने केलेल्या घरकुल मागणीच्या अर्जाबाबत चार वर्षे होऊनही कार्यवाही केली नाही. त्या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी दिशाभूल करणारी दिली व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा, जि.सातारा यांनी अपिलाचा निर्णय दिला नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विक्रम शंकर धुमाळ यांनी केले.

अपीलकर्ता श्री.विक्रम शंकर धुमाळ यांची घरकुल योजनेतील जागेची मागणी असून त्या संदर्भातील सर्व माहिती त्यांना दिली आहे. जागेच्या मागणीबाबतचा निर्णय ही प्रशासकीय बाब असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एल.कुंभारे यांनी केले. ते रास्त आहे. मात्र श्रीमती धुमाळ यांच्या अर्जावरील निर्णयप्रक्रियेची सद्यस्थिती त्यांना कळविली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) श्रीमती शशिकला शंकर धुमाळ यांचा जागा मागणीचा अर्ज दि.२०.६.२००६ चा आहे. 'त्याबाबत कार्यवाही सुरू असून अंतिम निर्णय झालेला नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी दि.१७.८.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविले आहे. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एल.कुंभारे यांनी त्या निर्णयाबाबतची सद्यस्थिती, निर्णयाला लागणाऱ्या कालावधीच्या कारणांसह अपीलकर्त्यास दि.५.६.२०१० पर्यंत कळवावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**

20 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उदय अनंतराव इंदूलकर — अपीलकर्ता
हजरे गल्ली, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
गडहिंग्लज नगर परिषद, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कर निरीक्षक,
गडहिंग्लज नगर परिषद, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२० / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,<br>गडहिंग्लज नगर परिषद, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. संजय हि. हेरवाडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कर निरीक्षक,<br>गडहिंग्लज नगर परिषद, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. एम. बी. पोवळ | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.७.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.९.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

मिळकतीला नाव दाखल होण्याबाबत ऑगस्ट २००८ मध्ये केलेल्या अर्जानुसार नाव दाखल झाले नसल्यामुळे त्या अनुषंगाने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक,

गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज यांनी दिली नाही, म्हणून केलेल्या अपिलाची दखल अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज यांनी घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. उदय अनंतराव इंदुलकर यांनी केली.

सप्टेंबर २००९ पासून आपण या पदावर कार्यरत असून अपीलकर्त्याच्या मागणीनुसार दि. २३.१०.२००९ रोजी संबंधित मिळकतीला नाव दाखल केले. मात्र मूळ प्रश्नात कार्यवाही केल्यामुळे स्वतंत्रपणे माहिती दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज श्री. एम. बी. पोवळ यांनी केले.

अपिलाची दखल विहित मुदतीत घेण्याबाबत आपला कटाक्ष असतो. तथापि हे अपील निदर्शनास आणण्यात आले नव्हते, त्यामुळे त्याची दखल घेता आली नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज श्री. संजय हेरवाडे यांनी केले.

मिळकतीस नाव दाखल केल्याचा उतारा अपीलकर्त्यास त्वरित द्यावा, तसेच अपील निदर्शनास न येण्याबाबतची चौकशी करुन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ८.४.२०१० रोजी अपीलकर्त्यास संबंधित उतारा देण्यात आल्याचे मुख्याधिकाऱ्यांनी दि.१२.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. दि. १६.४.२०१० च्या पत्रान्वये मुख्याधिकाऱ्यांनी मूळ अर्जावरील व अपिलावरील कार्यवाहीबाबत चौकशी करुन अहवाल सादर केला. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज, श्री. सुरेश एस. चावडे व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज, श्री. एम. बी. पोवळ यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केली नाही. अपील आपल्या निदर्शनास न आणण्यास जबाबदार श्री. पोवळ व श्री. चावडे आहेत, असे मुख्याधिकारी श्री. हेरवाडे यांनी अहवालात तपशिलाने नमूद केले आहे. याबाबतचा श्री. चावडे व श्री. पोवळ यांनी केलेला, वसुली आदी कामामुळे कार्यवाही नजरचुकीने राहिल्याचा खुलासा समाधानकारक व समर्थनीय नाही. त्यामुळे ते कारवाईस पात्र ठरतात. मात्र अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास अपील आणण्याची जबाबदारी नगर परिषदेकडील टपाल व्यवहार पाहणारे प्र. सहाय्यक निरीक्षक श्री. आर. एस. खटावकर यांची असल्याचे स्पष्ट होते. त्याबद्दल श्री. पोपळ यांना दोषी धरता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. श्री. आर.एस. खटावकर, प्र. सहाय्यक निरीक्षक यांनी अपील मुख्याधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याबाबत वेळेत कार्यवाही केली नाही, त्यामुळे त्यांना समज देण्यात येत आहे.

३. अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल श्री. सुरेश एस. चावडे व श्री. एम. बी. पोपळ हे शास्तीस पात्र आहेत. त्यामुळे त्यांना प्रत्येकी रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या मे, जून, जुलै व ऑगस्ट २०१० या महिन्यांच्या जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून चार समान हप्त्यांत वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज, नगर परिषद, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांनी करावी व आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

पुणे
दि. १२.५.२०१०.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मारुती धर्मा माने
मु.पो.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मुस्ती,
ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२३ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारुती धर्मा माने
मु.पो.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मुस्ती,
ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.१०.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर यांच्या नावे शुल्काची मनीऑर्डर पाठवूनही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मारूती धर्मा माने यांनी केली.

अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क कळविले. तसेच ग्रामपंचायतीची शासकीय बाकी रूपये ३२८०/- असल्याचे कळविले. शुल्काची रक्कम त्यांनी व्यक्तिगत नावाने मनीऑर्डर पाठविली त्यामुळे ती घेतली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.आय.एम.पठाण यांनी केले. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत शुल्क कळविले, सुनावणीची सूचना देऊनही अपीलकर्ता हजर राहिले नाहीत, त्यामुळे निर्णय दिला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.बी.एम.वासुदेव यांनी प्रतिपादन केले. मात्र अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणीनुसार / कागदपत्रांच्या आधारे लेखी स्वरूपात निर्णय देणे आवश्यक आहे, याची समज त्यांना देण्यात येत आहे. अपीलकर्त्यांनी माहिती आवश्यक असल्यास कळविलेले शुल्क रूपये ९०/- भरून प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 MAY 2010